ग्रामीण व नागरी भागात पिण्याच्या
पाण्याचा आराखडा तयार करण्यासाठी
आस्थापित केलेल्या मंत्रीमंडळ उप समितीचा
अहवाल

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत
गुणवत्ता नियंत्रण.

महाराष्ट्र शासन,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
शासन निर्णय, क्र. ग्रापापु १०९३/सीआर ४४८/[अ]/पापु-०७,
मंत्रालय, मुंबई-४०००३२, दिनांक: २२ फेब्रुवारी १९९६.

वाचा:- दि. १७ सप्टेंबर १९९४ या शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र. ग्रापापु १०९३/सीआर४०६[अ]/३९-अ,

ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या उपरोक्त दि. १७ सप्टेंबर १९९४ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ४ नुसार ग्रामीण पाणी पुरवठ्याच्या योजना मंजूर आराखड्याप्रमाणे राबविताना कार्यान्वयन यंत्रणा [जिल्हा परिषद, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळ] यांनी एका पाणी पुरवठा योजनेच्या कामासाठी एकाच ठेकेदाराची नियुक्ती करावी व ठेकेदारास कामाचा ठेका साहित्य सामुग्रीसह देण्यात यावा, स्थानिक क्षेत्रातील योजनांची कामे एकाच ठेकेदारांकडून पार पाडण्यासंबंधी हे आदेश जिल्हा परिषद यांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ च्या कलम २६१ [अ] अन्वये देण्यात येत असून ते त्यांच्यावर बंधनकारक आहेत. असे विहीत करण्यात आले आहे. तथापि, रत्नागिरी जिल्हा परिषदेस नळ योजनांची कामे करून घेण्याकरीता साहित्य सामुग्रीसह ठेका घेणारे ठेकेदार उपलब्ध होत नसल्यामुळे तसेच सन १९९५-९६ या आर्थिक वर्षातील ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाचे उद्दिष्ट पार पाडता यावे याकरिता <u>फक्त दि. ३१.३.१९९६ पर्यंतच्या मुदतीकरिता</u> ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी लागणारे साहित्य जिल्हा परिषदेने विहीत पध्दतीनुसार खरेदी करून पाणी पुरवठा योजनेच्या कामाचा ठेका/ठेकेदारांस देण्यास शासन रत्नागिरी जिल्हा परिषदेस मान्यता देत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[र. न. देशमुख]
शासनाचे अवर सचिव.

प्रति,
१] विभागीय आयुक्त, कोकण विभाग,
२] जिल्हाधिकारी, रत्नागिरी,
३] मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी,
४] महालेखापाल लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई,
५] महालेखापाल लेखा परिक्षा, महाराष्ट्र-१, मुंबई
६] मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई.

पाटील/२२२